Gør alle tog-
stationer til-
gængelige
for handicap-
pede / 육교를
더 많이 만듭
시다 / Öffentli-
che Ver-
kehrszentren
in Kulturzent-
ren verwan-
deln / Give
tax credits for
riding a bicy-
cle / 每天早上有公社瑜伽 /
أن تجعل الخيارات السليمة
سهلة المنال / Pintar las ace-
ras de diferentes colores /

Et
des
loge-
ments
bon
marché
dans tous
les quartiers
/ चिकित्साभरे
बाग बगीचों की
रचना हो ताकि
तनाव को रोका
जा सके / Ite'ramo si-
se awon eto idanileko
siwaju si paapa julo ni
awon adugbo ti o ba si
ku die k'a a
to / Κοινωτική

Εκπαίδευση
για την διαχεί-
ρηση των
αποβλήτων /
Portare più lu-
ce naturale
nelle metro-
politana / יוצר
יותר מקומות צי
בוריים חדשניים
ורב תכליתיים
/ दर नवीन
बाधणी बरोबर
पाच झाडे लावणे
/ Meer publie-
ke ruimte voor
muziek en
kunst / 公共交

通機関と公共
交通機関をつ
なげるために、
自転車用車線
を設置する /
Dołóż więcej
starań do
zredukowa-
nia hałasu /
Установить
на крышах
садики или
солнечные
батареи, ко-
торые будут
пользовать-
ся общим
доступом /

ปลูกต้นไม้กั้น
ระหว่างทางเท้า
และถนน / Criar
uma versão virtu-
al do munici-
pio através
das redes
sociais / Làm
thùng hấp dẫn
để che giấu rác
/ هرهفته چیز تاه‌ای
به همسایه‌های
خود می‌آموزم
/ Büyük şe-
hirlerde kompakt
araba paylaşım
programları ge-
liştirerek /

BMW GUGGENHEIM LAB

**News Release**


**Advisory Committee**
Daniel Barenboim
Elizabeth Diller
Nicholas Humphrey
Muchadeyi Ashton Masunda
Enrique Peñalosa
Juliet Schor
Rirkrit Tiravanija
Geetam Tiwari
Wang Shi


# मुंबईतील डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालयात ९ डिसेंबर २०१२ पासून बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅब ची सुरुवात, संपूर्ण शहरात 'पॉप अप' साईट्स सुरू करणार

**मोफत कार्यक्रमांच्या आयोजनातून लोकांना सार्वजनिक आणि वैयक्तिक आयुष्यात समतोल साधण्यास होणार मदत**

**मुंबई लॅब चमूची घोषणा**

**मुंबई/न्यूयॉर्क, २२ ऑक्टोबर २०१२-** बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅब त्यांच्या ९ डिसेंबर २०१२ ते २० जानेवारी २०१३ या दरम्यान सुरू असलेल्या जागतिक यात्रेमध्ये मुंबईत आपला मुक्काम करणार असून या प्रदर्शना करता मुंबईतील डॉ. भाऊ दाजी लाड वस्तूसंग्रहालया बरोबर सहकार्य करून विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन मुंबईतील विविध ठिकाणी करण्यात येणार आहे. यामध्ये डिझाईन प्रकल्प, सहभागातून अभ्यास, सहली, भाषणे, कार्यशाळा, चित्रपटांचे प्रदर्शन आणि अन्य सांस्कृतिक कार्यक्रमांचा सहभाग असेल. या माध्यमातून मुंबईकर आपले वैयक्तिक आयुष्य आणि सामाजिक आयुष्य यांच्यातील समतोल साधून सातत्याने वाढणाऱ्या २० दशलक्षाहून अधिक लोकसंख्येच्या मुंबई शहरात कसे आनंदाने जगावे याविषयी समतोल साधू शकतील. या मोबाईल प्रकल्पाचा न्यूयॉर्क आणि बर्लिन नंतरचा हा तिसरा थांबा आहे.

शहरी विचारवंतांचा एक भाग, सामाजिक केंद्र आणि लोकांना एकत्र आणण्याच्या आपल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅबने प्रथमच अशा प्रकारच्या जागतिक स्तरावरील उपक्रमांची सुरूवात केली असून त्यामुळे शहरी जीवनशैलीत येणाऱ्या आव्हानांचा मुकाबला करून जगभरांतील शहरांमध्ये


**Solomon R. Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

उत्साह वाढवण्याचा उद्देश या कार्यक्रमांमागे ठेवण्यात आला आहे. याचबरोबर अशा प्रकारचे मोफत कार्यक्रम शहरांतील अन्य ठिकाणी आयोजित करून लोकांना (bmwguggenheimlab.org) वेबसाईट वरील प्रकल्पाला भेट देण्यासाठी उद्युक्त केले जाते आणि ऑनलाईन सोशल कम्युनिटीच्या माध्यमातून एकमेकांशी संपर्क साधून किंवा लॅबचे (bmwguggenheimlab.org/subscribe) ई न्यूजलेटर खरेदी करून नवीन प्रकल्पातील घडामोडींविषयी माहिती दिली जाते.

या उपक्रमाचा मुख्य कार्यक्रम हा मुंबईतील भायखळा येथे असलेल्या डॉ. भाऊ दाजी लाड वस्तूसंग्रहालयात होणार असून हे स्थान मुंबईच्या प्रसिध्द अशा जैवविविधता उद्यान तसेच प्राणीसंग्रहालयाच्या जवळच आहे. त्याचबरोबर यातील अर्ध्याहून अधिक कार्यक्रम हे शहरातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात येणार असून त्यामुळे लॅबचे विविध कार्यक्रम शहरात दूरवर असलेल्या अधिकतर लोकांपर्यंत पोहोचण्यास मोठी मदत होऊ शकेल. येत्या काही आठवडयांच्या कालावधीत अन्य कार्यक्रम स्थळांची आणि कार्यक्रमांची घोषणा करण्यात येणार आहे.

‘‘ बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅब मुंबईत लोकांसाठी अनोख्या कार्यक्रमांचे आयोजन करत आहे. जसजसा याचा प्रसार होत जाईल तसतशी यामध्ये लोकांचा सहभाग वाढीस लागून शहरी जीवनातील महत्त्वपूर्ण अडचणी, त्यांवर कशी मात करता येईल याचा अभ्यास अनोख्या पध्दतीने मुंबईकर करू शकतील. मुंबई हे शहर भारताची आर्थिक आणि मनोरंजन क्षेत्राची राजधानी मानली जाते तसेच हे शहर आघाडीचे विज्ञान केंद्र म्हणूनही प्रसिध्द आहे.’’ असे सॉलोमन आर गुगेनहेम म्युझियम आणि फाऊन्डेशन चे संचालक रिचर्ड आर्मस्ट्राँग यांनी सांगितले ‘‘ भारतातील आघाडीच्या आणि महत्त्वपूर्ण राष्ट्रीय गोष्टींचे जतन करणाऱ्या प्रतिष्ठित अशा वस्तूसंग्रहालयांपैकी एक असलेल्या डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालयाबरोबर सहकार्य करतांना आंम्हाला आनंद होत असून बीएमडब्ल्यू अशाच प्रकारे आंम्हाला सहकार्य करत राहील.’’

‘‘ मुंबईला पुन्हा एकदा बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅबच्या सातत्याने होत असलेल्या प्रयत्नांमुळे त्यांचे गतवैभव पाहण्याची संधी उपलब्ध होणार असून असा प्रवास आम्ही जगभरांतील मोठया शहरांत आयोजित करणार आहोत.’’ बीएमडब्ल्यूएजी च्या व्यवस्थापन मंडळाचे सभासद फ्रँक पीटी अर्न्ड यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले ‘‘ विविधतेने नटलेल्या या शहरातील समाजाला एकत्रित बांधून कार्यक्रम आयोजित करण्याच्या गुगेनहेमच्या प्रयत्नांबरोबरच लॅबच्या चमूने एकत्र येऊन डॉ. भाऊ दाजी लाड वस्तूसंग्रहालयाने

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

एकत्रितपणे मुंबईकरता विशेष कार्यक्रमांचे आयोजन करून जगभरातील तसेच विशिष्ट प्रेक्षकांना एकत्र आणण्याचे काम केले आहे.''

'' अशा महत्त्वपूर्ण कार्यक्रमासाठी सॉलोमन आर गुगेनहेम वस्तूसंग्रहालयाशी सहकार्य करतांना आंम्हाला आनंद होत आहे.'' डॉ. भाऊ दाजी लाड वस्तूसंग्रहालयाच्या व्यवस्थापकीय विश्वस्त आणि मानद संचालिका तनसिम मेहता यांनी सांगितले. त्या पुढे म्हणाल्या '' जसे आपण मुंबईची परंपरा जतन करून ठेवतो आणि येथील वस्तू आमच्या संग्रहालयात असतात त्याचप्रमाणे भविष्याकडे पाहून आणि दिर्घकालीन व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून हे शहर जतन करण्यासाठी आणि जगभरांतील अन्य शहरांतील समस्याही जाणून घेणे गरजेचे आहे.''

मुंबईतील लॅब चमू आणि सल्लागार समिती

मुंबईतील लॅब चमूने गुगेनहेम क्युरेटर डेव्हीड व्हॅन डेर लीअर आणि क्युरेटोरिअल सहाय्यक स्टेफनी क्वाई यांच्या बरोबर एकत्रितपणे लॅबकरता कार्यक्रम तयार केला आहे. यामध्ये त्यांच्या क्षेत्रातील चार उदयोन्मुख व्यक्तींचा समावेश असून त्यामध्ये मालावई येथे स्थित ब्रिटिश सांस्कृतिक अभ्यासक आएशा दासगुप्ता, चीन स्थित डच वास्तुविशारद नेव्हील मार्स, मुंबई वास्तुविशारद आणि शहरी परिहवन डिझायनर तृप्ती अमृतवार वैतला आणि ब्राझील स्थित मेक्सिकन कलाकार हेक्टर झामोरा यांचा समावेश आहे.

लॅब चमूतील सदस्यांचे नामांकन बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅब सल्लागार समितीने केले असून यामध्ये विविध शाखांमधील आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांचा समावेश आहे. दिल्ली स्थित परिवहन नियोजक आणि सुरक्षा तज्ज्ञ गीतम तिवारी यांचे नाव नुकतेच सल्लागार समितीकरता सुचवले गेले.

कार्यक्रमासंबंधी दृष्टिक्षेप

बीएमडब्ल्यू गुगेनहॅम लॅब च्या वतीने मुंबईत विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले जात असून ते खासकरून मुंबईकरांसाठी विकसित करण्यात आले आहेत. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, आणि नेते यांसह लॅब मुंबईतील स्थानिक विचारवंत आणि संशोधक यांसह कार्यक्रम सादर करणार असून त्यामध्ये विद्यार्थी, शेजारी, तळागाळातील कार्यकर्ते, समालोचक, स्थानिक संस्था आणि सामाजिक गट यांचा समावेश आहे.

''नेहमी शहरात राहणाऱ्या लोकांकडून आम्हाला शहरी जीवनाविषयी अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची संधी मिळेल. येथील संधी आणि आव्हाने याविषयीही समजू शकेल,'' असे बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅब क्युरेटर डेव्हीड व्हेन डेर लीअर यांनी सांगितले. ''आमचा असा विश्वास आहे की, लॅबच्या कल्पना, शोध आणि प्रयोग यातून व्यक्तिगत आणि सार्वजनिक जागेचा परिणामकारक वापर किंवा पुर्नवापर कसा करता येईल याबाबत विचार करण्यास मदत मिळेल.''

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

मुंबई लॅबच्या वतीने विविध प्रकारच्या सेवा दिल्या जात आहेत. यातील कार्यक्रमांच्या माध्यमातून शहर अधिकारी आणि शहर नियोजक यांसह लोकांना एकत्र आणले जाईल. आणि परिवहन, घरे, पाणी आणि प्रशासन आदीशी संबंधित विषयांबाबत मार्गदर्शन करता येईल. मुंबईतील गजबजलेल्या ठिकाणी होणाऱ्या वाहतुकीच्या खोळंब्याविषयी योजना आखता येतील. तसेच पायाभूत सुविधांची नव्याने आखणी कशाप्रकारे करता येईल याचीही योजना करता येईल. मनोरंजन करणारे कलाकार, चित्रपटनिर्माते, कथाकार, शेफ आणि अन्य लोक मुंबईविषयक अनुभव सांगून आपापल्या दृष्टीकोनातून कॅलिडोस्कोप तयार करू शकतात. यातूनच नागरिकांमधील वैविध्य आणि नवनवीन गोष्टी स्वीकारण्याची तयारी दिसून येते. तसेच ज्या कुटुंबाना मुंबईतील ऐतिहासिक, सांस्कृतिक तसेच समकालीन शहरी जीवनाविषयी शिकण्याची इच्छा आहे त्यांच्याकरता डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियमच्या वतीने विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.
मुंबई लॅबचे कामाचे दिवस आणि कार्यक्रमासंबंधी वेळापत्रक आगामी महिन्यांमध्ये जाहीर केले जाईल.

लॅब डिझाईन

न्यूयॉर्क आणि बर्लिनप्रमाणे बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅब मुंबईची रचना ही शहरी पर्यावरणाप्रमाणे आहे. मुंबईकरता टोकियो वास्तुविशारद अटेलिअर बो-वो यांनी एक संरचना तयार केली असून ती शहरातील गजबजलेल्या लोकवस्तीकरताच उपयुक्त ठरेल. याची कल्पना भारतीय मंडप या पारंपारीक मॉडेलवरून घेण्यात आली असून पूर्वी सार्वजनिक कार्यक्रम साजरे करण्यासाठी याचा वापर केला जात असे. याची बांधणी प्रामुख्याने बांबूपासून होत असून याकरता आवश्यक बांधकाम साहित्य विशेषकरून दक्षिण आशियामध्ये वापरले जाते. लॅबची मुख्य एल आकारातील रचना ही डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियममधील बागांमध्ये असलेल्या झाडांच्या सावलीत उभारण्यात आली आहे. लॅबच्या आधुनिक आवृत्ती मध्ये मुख्य संरचनेत एक विंग दर्शवण्यात आली असून शहरातील सॅटेलाईट साईट्समध्ये पर्यटन केले जाईल.

बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅब विषयी –

बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅब ही सोलोमन आर गुगेनहेम फाउंडेशन आणि बीएमडब्ल्यू ग्रूप यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आली आहे. बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅबचे क्युरेटिंग डेव्हीड व्हॅन डेर लीअर आणि सोलोमन आर गुगेनहेम म्युझियमचे मारिया निकानोर यांच्यावतीने केले जाते. लॅबचे ग्राफीक हे सेओल स्थित ग्राफिक डिझायनर सल्की ॲण्ड मिन यांच्यावतीने विकसित करण्यात आले आहे. लॅबमध्ये होणाऱ्या घडामोडी प्रकल्प ब्लॉगवर Lab | Log नोंदवले जातात. तसेच बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅबच्या योगदानकर्त्यांसमवेत झालेल्या मुलाखती चित्रित केल्या जातात. लोकांनाही बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅबच्या सोशल कम्युनिटीमध्ये एकत्र येण्यासाठी ट्विटर वर (@BMWGuggLab and #BGLab), Facebook, YouTube, Flickr, and Foursquare) आमंत्रित केले जाते.

बीएमडब्ल्यू गुगेनहेम लॅबला विविध प्रतिष्ठित मानांकने मिळाली असून यामध्ये वेबी ॲवॉर्ड्स नॉमिनेशन फॉर एक्सेलन्स ऑन दि इंटरनेट, इंटरनॅशनल डिझाईन कम्युनिकेशन ॲवॉर्ड फॉर बेस्ट लोगो आणि

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

अमेरिकन इन्स्टिटट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स, न्यूयॉर्क स्टेट चॅप्टर सिटेशन फॉर डिझाईन एक्सेलन्स यांचा समावेश आहे. हा प्रकल्प युनायेड नेशन्सनेही नावाजला असून लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असलेला आणि महत्त्वपूर्ण शहरी समस्यांविषयी चर्चा होणारा उल्लेखनीय प्रकल्प आहे. लॅबची वैशिष्ट्ये टेडच्या वेबसाईटवर सांगण्यात आली आहेत. सिटी २.० मध्ये जगभरातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमध्ये याची गणना करण्यात आली असून शहरी जीवनाविषयी संवाद निर्माण करण्याकरता प्रयत्नशील आहे.

**Urbanology**, हा शहर नियोजनासंबंधी गेम लॅबच्या वेबसाईटवर टाकण्यात आला असून अमेरिकन असोसिएशन ऑफ म्युझियम्सच्या म्यूस ॲवॉर्डने त्याला सन्मानित करण्यात आले आहे.

चालू उपक्रमाच्या भविष्यकालीन योजना नंतर जाहीर केल्या जातील.

सोलोमन आर गुगेनहेम फाउंडेशनविषयी

१९३७ मध्ये स्थापना झालेली सोलोमन गुगेनहेम फाउंडेशन ही कलेच्या प्रशंसेकरता समर्पित करण्यात आली असून यामध्ये प्रामुख्याने आधुनिक आणि समकालीन कालावधी समाविष्ट करण्यात आला आहे. याकरता प्रदर्शने, शैक्षणिक कार्यक्रम, संशोधनपर उपक्रम आणि प्रकाशने यांचा समावेश करण्यात आला आहे. १९७० मध्ये जागतिक नेटवर्क सुरू झाले तेव्हा सोलोमन आर गुगेनहेम म्युझियम, न्यूयॉर्क ने पेगी गुगेनहेम कलेक्शन, व्हेनिससमवेत युती केली. विस्तारांतर्गत गुगेनहेम म्युझियम बिबाव (१९९७ मध्ये सुरु), डॉईश गुगेनहेम इन बर्लिन (१९९७-२०१३) आणि गुगेनहेम अबू धाबी यांचा समावेश करण्यात आला. भविष्याचा वेध घेताना गुगेनहेम फाउंडेशनने आंतरराष्ट्रीय स्तरावर युती सुरू केली असून त्यामध्ये समकालीन कला, वास्तुशास्त्र, डिझाईन यांचा समावेश करण्यात आला आहे. फाउंडेशनविषयी अधिक माहिती हवी असल्यास **guggenheim.org**. येथे मिळू शकेल.

बीएमडब्ल्यूच्या सांस्कृतिक आश्वासनाविषयी:

४० वर्षांपेक्षा अधिक काळापासून बीएमडब्ल्यू ग्रूप हा जगभरातील १०० हून अधिक सांस्कृतिक सहकार्य उपक्रमांशी संबंधित आहे. कंपनी प्रामुख्याने आधुनिक आणि समकालीन कला आणि शास्त्रीय संगीत तसेच वास्तुशास्त्र आणि डिझाईन यावर दीर्घकाळाकरता भर देत आहे. मागील आठ वर्षांपासून बीएमडब्ल्यू ग्रूपने डाऊ जोन्स सस्टेनॅबिलिटी इंडेक्सेसमध्ये नाव नोंदवले आहे. १९७२ मध्ये तीन मोठी पेंटिंग्ज कलाकार जरहार्ड रिचस्टर यांनी तयार केली होती त्यांना बीएमडब्ल्यू ग्रूपच्या म्युनिच मुख्यालयात प्रवेश मिळाला. तेव्हापासून ॲण्डी वारहोल, रॉय लिचटेन्स्टेन, ओलाफर एलिसन, जेफ कून्स, झुबिन मेहता, डॅनिअल बरेनबोईम आणि ॲना नेट्रेब्को यासारखे कलाकार बीएमडब्ल्यूसमवेत सहकार्य करत होते. कंपनीने कार्ल शेचवॅन्झर, झाहा हादीद आणि कूप हिमेल्ब यासारख्या प्रसिद्ध वास्तुविशारदांच्या मदतीने महत्त्वपूर्ण कॉर्पोरेट इमारती आणि झाडांचे डिझाईन करण्यात आले. बीएमडब्ल्यू ग्रूप सर्वप्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांकरता सर्जनशील स्वातंत्र्य देत असून कलात्मक कामाकरता ते आवश्यक असते तसेच यशस्वी व्यवसायातील आधुनिकीकरणासाठीही आवश्यक असते. अधिक माहिती

http://www.bmwgroup.com/culture and

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

http://www.bmwgroup.com/culture/overview येथे मिळेल.

डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियमविषयी

डॉ. भाऊ दाजी लाड मुंबई सिटी म्युझियमची स्थापना १८७२ मध्ये व्हिक्टोरिया ॲण्ड अल्बर्ट म्युझियम, बॉम्बे या नावाने करण्यात आली. १९७५ मध्ये म्युझियमचे नाव बदलून डॉ.भाऊ दाजी लाड म्युझियम असे ठेवण्यात आले. त्यांची दूरदृष्टी आणि समर्पण यामुळे त्यांना हा सन्मान मिळाला. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा एक भाग असलेली ही संस्था मुंबईतील सर्वात जुने आणि देशातील तिसरे म्युझियम आहे. म्युझियमच्या कलेक्शनमध्ये डेकोरेटिव्ह आर्ट्स ऑफ इंडिया दर्शवण्यात आले असून क्ले मॉडेल्स आणि डायोरामाचे चांगले कलेक्शन आहे. याअंतर्गत मुंबईतील लोकांचे जीवन चित्रित करण्यात आले असून एकोणिसाव्या तसेच विसाव्या शतकाच्या सुरुवातीचा इतिहास सांगण्यात आला आहे. इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट ॲण्ड कल्चरल हेरिटेजने चार वर्ष केलेला पाठपुरावा आणि जमनालाल बजाज फाउंडेशनचा पाठिंबा यामुळे हे म्युझियम जानेवारी २००८ पासून लोकांकरता खुले करण्यात आले.

संपूर्ण प्रेस मटेरिअलकरता **bmwguggenheimlab.org/presskits** येथे भेट द्या.

पब्लिसिटी इमेजेसकरता bmwguggenheimlab.org/pressimages

येथे भेट द्या.

पब्लिसिटी व्हिडिओकरता **bmwguggenheimlab.org/pressvideos** येथे भेट द्या.

यूजर आयडी - फोटोसर्व्हीस

पासवर्ड - प्रेसपास


संपर्क :

मुंबई

झीनत दुबेरिया

रुडर फिन इंडिया

९१ ९१६७५७७४६७

duberiaz@ruderfinnasia.com

आंतरराष्ट्रीय

काटे लिडेकर

पोल्स्कीन आर्ट्स ॲण्ड कम्युनिकेशन्स काउन्सेलर

१ २१२७१५१६०२

lydeckerk@finnpartners.com